# LK Vet Care Pvt. Ltd.

|| पशुसंपन्नतार्थम् तंत्रोपासना ||

---

# ‘एल के व्हेट केअर’ ची डिजिटल; फ्रोझन सिमेन थॉईंग प्रक्रिया अर्थात गोठलेले वीर्य विगलन करण्याची प्रक्रिया



# 'एल के व्हेट केअर' च्या डीएफएसटीएस किटमधील उपकरणे आणि साहित्य

**'एल के व्हेट केअर' चे डीएफएसटीएस किट म्हणजे एक बॅग असते.**

## 1 डीएफएसटीएस बॅग

1 डीएफएसटीएस म्हणजेच 'डिजिटल; फ्रोझन सिमेन थॉईंग सिस्टीम'



डीएफएसटीएस आणि मोटर सायकलची बॅटरी जोडण्यासाठी १ मीटर लांब केबल



मोटरसायकलच्या बॅटरीसाठी एक छोटी कनेक्टिंग केबल



## डीएफएसटीएस बॅग सोबत

1 डीएफएसटीएस अ‍ॅडॉप्टर (12V/ 5Amp) आणि पॉवर कॉर्ड (घेतले असल्यास)



# 'एल के व्हेट केअर'च्या डीएफएसटीएस किटमधील उपकरणे आणि साहित्यांची तोंड ओळख:

## डीएफएसटीएस







## मोटरसायकलच्या बॅटरीसाठी एक छोटी कनेक्टिंग केबल



**लक्षात ठेवा:** जनावरांची कोणतीही चाचणी किंवा परीक्षण करताना सुरक्षितता आणि स्वच्छतेसाठी, नेहमी ॲप्रन, कॅप, हॅन्डग्लोव्हस, मास्क, गमबूट परिधान करा.













**फ्रोझन सिमेनची ’एल के व्हेट केअर’ प्रणीत तंत्रशुद्ध आणि शास्त्रीयदृष्ट्या योग्य अशी थॉईंग प्रक्रिया.**

# फ्रोझन सिमेनची 'एल के व्हेट केअर' प्रणीत थॉईंग प्रक्रिया:




# 1. थॉईंगसाठी डीएफएसटीएस तयार ठेवणे

**1.1** डीएफएसटीएस (DFSTS) आणि मोटर सायकलची बॅटरी जोडण्यासाठी, मोठ्या १ मीटर लांब केबलला छोटी कनेक्टिंग केबल जोडा.



**1.2** छोट्या कनेक्टिंग केबलचे, दोन वायरचे ओपन टर्मिनल मोटर सायकलच्या बॅटरीला जोडा. लाल वायर बॅटरीच्या पॉझीटीव्हला आणि ब्लॅक/ब्लू वायर बॅटरीच्या निगेटिव्हला जोडा.



**1.3** डीएफएसटीएसचा ऑन-ऑफ स्विच बंद आहे याची खात्री करा. मोठ्या १ मीटर लांब केबलचे दुसरे टोक डीएफएसटीएसच्या 12V DC IN सॉकेटमध्ये जोडा.



**1.4** आता डीएफएसटीएसची कॅप उघडा आणि त्यात पूर्ण पाणी भरा (अंदाजे 40 मिली). कॅप व्यवस्थित लावून घ्या.



**1.5** आता डीएफएसटीएस सपाट (समतल) पृष्ठभागावर ठेवा. ऑन-ऑफ स्विचद्वारे डीएफएसटीएस चालू करा.



**1.6** टेम्परेचर डिस्प्ले आतील पाण्याचे सद्य तापमान दर्शवितो जे आसपासच्या तापमानाएवढेच असते. तेव्हा एकदा बीप साऊंड वाजतो. तेव्हा डीएफएसटीएसच्या पुढील बाजूस असलेला लाल एलईडी बंद असतो.



## 1. थॉईंगसाठी डीएफएसटीएस तयार ठेवणे

**1.7** थॉईंगसाठी स्टार्ट/ स्टॉप पुश बटन दाबा. तेव्हा एकदा बीप साऊंड वाजून लाल एलईडी सुरु होतो.



**1.8** आता टेम्परेचर डिस्प्ले पाण्याचे वाढते तापमान दर्शवितो. 33 डिग्री सेल्सियसला व्हायब्रेटर आपोआप सुरू होतो. ५-६ मिनिटांत आतील पाण्याचे तापमान वाढून 37 डिग्री सेंटीग्रेड होते. (हे तापमान थॉईंग पूर्ण होईपर्यंत ते स्थिर राहते.) जेव्हा तापमान 37 डिग्री सेल्सिअसला पोहोचते तेव्हा दोनदा बीप वाजतो. अशा प्रकारे डीएफएसटीएस थॉईंगसाठी सज्ज आहे.



## 2. थॉईंगसाठी सीमेन स्ट्रॉ तयार ठेवणे.

**2.1** चिमट्याच्या साहाय्याने सीमेन स्ट्रॉ LN2 कंटेनर म्हणजेच नायट्रोजन सिलेंडर मधुन बाहेर काढा.



**2.2** स्ट्रॉ बाहेर काढताना 'हात थेट लिक्विड नायट्रोजन च्या संपर्कात येणार नाही' याची खबरदारी घ्या.



## 3. डीएफएसटीएसमध्ये सीमेनचे थॉईंग करणे.

**3.1** थॉईंगसाठी सज्ज असलेल्या डीएफएसटीएसची कॅप उघडा, सीमेन स्ट्रॉ डीएफएसटीएसमध्ये घाला आणि कॅप घट्ट लावून घ्या.



**3.2** डीएफएसटीएसच्या टेम्परेचर डिस्प्लेवर तापमान 37 डिग्री सेल्सियस असे स्थिर दाखवत असताना, 15-20 सेकंद थांबा.



LK Vet Care Pvt. Ltd.

## 3. डीएफएसटीएसमध्ये सीमेनचे थॉईंग करणे.

**3.3** आता 30 सेकंदाच्या थॉईंग सायकलसाठी स्टार्ट/ स्टॉप पुश बटन दाबा. तेव्हा एकदा बीप साऊंड वाजतो. लाल एलईडी बंद होईल आणि आतमध्ये थॉईंगची प्रक्रिया सुरु होईल. व्हायब्रेटरही बंद होईल.



**3.4** 30 सेकंदांनंतर डीएफएसटीएस ३ वेळा बीप करतो आणि डीएफएसटीएसच्या पुढील बाजूस असलेला लाल एलईडी लागतो. अशा प्रकारे थॉईंग पूर्ण झाल्याचे कळते.



**3.5** आता डीएफएसटीएसची कॅप उघडा आणि चिमट्याच्या साहाय्याने थॉईंग झालेला सीमेन स्ट्रॉ बाहेर काढा. अशा प्रकारे सीमेन स्ट्रॉ पुढील कृत्रिम रेतन प्रक्रियेसाठी तयार आहे.



**लक्षात ठेवा:** कृत्रिम रेतनाच्या पारंपारिक 'पर रेक्टल' पध्दतीऐवजी 'एल के व्हेट केअर'ची अत्याधुनिक डिजिटल आर्टीफिशीअल इन्सेमिनेशन गन अर्थात डीएआयजी आणि संबंधित साहित्य एल के व्हेट केअर कंपनीकडे स्वतंत्रपणे उपलब्ध आहे.



**3.6** थॉईंगची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर डीएफएसटीएस युनिट बंद करा आणि डीएफएसटीएसची बॅटरी कनेक्शन्स काढून टाका. शेवटी डीएफएसटीएस मधील पाणी ओतून टाका.



LK Vet Care Pvt. Ltd.

## लक्षात ठेवा:

पाणी घातल्याशिवाय डीएफएसटीएस कधीही वापरू नका.

डीएफएसटीएस नेहमी उभा ठेऊनच वापरा.

सलग १० थॉईंगनंतर डीएफएसटीएसमधील पाणी बदलत रहा.

डीएफएसटीएस स्वच्छ करण्यासाठी साध्या पाण्याचाच वापर करा. साफ करताना, कोणत्याही प्रकारचे क्लिनींग सोल्युशन/ डिटर्जंट वापरु नका किंवा पाण्यामध्येही डिटर्जंट मिसळू नका.

डीएफएसटीएस थेट मेन्स म्हणजे इलेक्ट्रिसिटीवरही चालते. त्यासाठी डीएफएसटीएसचा ॲडॉप्टर (12V/ 5Amp) आणि पॉवर कॉर्ड असणे आवश्यक असते.

**सर्व उप-प्रक्रियांसह एका फ्रोझन सीमेन स्ट्रॉसाठीची ही संपूर्ण 'एल के व्हेट केअर' प्रणीत तंत्रशुद्ध आणि शास्त्रीयदृष्ट्या योग्य अशी थॉईंग प्रक्रिया केवळ 5-7 मिनिटात पूर्ण होते.**

LK Vet Care Pvt. Ltd.

# तंत्रशुद्ध व शास्त्रीयदृष्ट्या योग्य कृत्रिम रेतन प्रक्रियेसाठी 'एल के व्हेट केअर'ची 'डिजिटल ए-आय गन' आणि 'डीएफएसटीएस' जरूर वापरा!

संपर्क

**LK Vet Care Pvt. Ltd.**

|| पशुसंपन्नतार्थम् तंत्रोपासना ||

**पुणे:** 3 ए, रचना अव्हेन्यू, एफ सी रोड,
डेक्कन जिमखाना, पुणे-411004. फोन: 9552524949

**पंढरपूर:** #1, पुजारी सिटी, केबीपी कॉलेज चौकाजवळ,
वाखरी रोड, पंढरपूर-413304. फोन: 8275206604

